महापालिका आयुक्त
अधिकार सुपुर्ती क्र - एमसी/डीईएल / १५१८
दिनांक - 2 4 JUN 2020

महापालिका आयुक्त कार्यालय
पुणे महानगरपालिका
जावक क्र.मआ/साप्रवि/आस्था-१८६०
दिनांक - २४।०६।२०२०

**-: आदेश :-**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमचे अन्वये पशु वैद्यकीय विभागाशी संबंधित कलम ३३३ (१) व (२), ३३४ (१) (२) व (३),३३५ (१) व (३), ३३६ (१) (२) (३) व (४),३३७,३३८ (१) (२),३३९,३७६ (१)(अ)(क),३७६ (५) (अ) (ब), ३७७ (१) (२),३७९,३८०, ३८१,३८२ (अ) (ब), ३८६ (१) (३) (४) (५) (७), ३८७ (२) (ग) (ह), शेड्युल चाप्टर १४ (२२) (१) (अ) (२) (३) (४) शेड्युल चाप्टर (१५) (२) या कलमांची अंमलबजावणी व कार्यवाही करण्याचे अधिकार मा.महापालिका आयुक्त यांना आहेत.

उपरोक्त नमूद केलेल्या कलमांतर्गत महापालिका आयुक्त यांना असलेले अधिकार आरोग्य अधिकारी व सहाय्यक आरोग्य अधिकारी व क्षेत्रीय वैद्यकीय अधिकारी यांना यापूर्वीच प्रदान करण्यात आलेले आहेत. सदर प्रमाणे सदर अधिकार व्हेटरनरी सुपरिटेंडेट तथा मुख्य पशु वैद्यकीय अधिकारी आरोग्य विभाग,पुणे महानगरपालिका यांना देखील सुपूर्त करणे आवश्यक आहे त्या अनुषंगाने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमचे वरील नमूद कलमानुसार कार्यवाहीचे महापालिका आयुक्त यांना असलेले अधिकार व्हेटरनरी सुपरिटेंडेट तथा मुख्य पशु वैद्यकीय अधिकारी यांना देखील सुपूर्त करण्यात येत आहेत.

वरील अधिकार सुपुर्ती ही अधिनियमातील तरतुदीनुसार जेथे जनावरे/पशु यांचेशी संबंधीत कामकाज असेल तेथेच लागू राहील.

तरी व्हेटरनरी सुपरिटेंडेट तथा मुख्य पशु वैद्यकीय अधिकारी यांनी उपरोक्त अधिकार सुपुर्ती नुसार या आज्ञापत्रकाचे दिनांकापासून पुढील जरूर ती कार्यवाही आरोग्य अधिकारी यांचे नियंत्रणाखाली करावी.

**(शेखर गायकवाड)**
**महापालिका आयुक्त**
**पुणे महानगरपालिका**

प्रत :

१. अति.महापालिका आयुक्त (ज/वि/ई)
पुणे महानगरपालिका
२. सर्व संबंधित खाते प्रमुख
पुणे महानगरपालिका

यांजकडे माहितीस्तव व पुढील कार्यवाहीस्तव अग्रेषित ---